सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## संचालनालय, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य.
## कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४

☎/🖷 022,27571391 website www.mahalfa.in E.Mail: ad.report @mahalfa.in

**कार्यालयीन आदेश क्र. ८१ दिनांक 8 NOV 2011**

विषय :- ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करताना घ्यावयाची दक्षता..

संदर्भ :- १) या संचालनालयाचा कार्यालयीन आदेश क्र. ५ दि. ४/१/२०१०.

संदर्भिय आदेशामध्ये नमुद केलेली अंडर सर्टिफीकेट ऑफ पोस्टींग ही पध्दत पोस्ट खात्यामार्फत दि. २३/२/२०११ पासून बंद करण्यात आलेली आहे. यामुळे यापुढे ग्रामपंचायत लेखापरीक्षण अहवाल संबंधित संस्थेस पोहोच करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. ज्या ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण करण्यात आलेले आहे त्या ग्रामपंचायतीस सदर लेखापरीक्षण अहवाल पोस्ट खात्याच्या प्रचलित साधे टपाल पध्दतीने पाठविण्यात यावा.

२. संबंधित पंचायत समिती कार्यालयाची प्रत पंचायत समिती कार्यालयाच्या शिपाई मार्फत दर सोमवारी सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयातून हस्ते घेऊन जाण्याबाबत पंचायत समिती कार्यालयास कळवावे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालयाची प्रत सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाच्या शिपाई मार्फत जिल्हा परिषदेच्या आवक विभागात थेट देण्यात यावी व त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीत घेण्यात यावी.

(र.भा.भागवत)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य.

प्रत :१) सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व.
२) सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व.यांनी पंचायत समिती कार्यालयाची प्रत देणेकरिता स्वतंत्र नोंदवही ठेवावी.
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व. यांना माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव.
४) संगणक शाखा.
५) अभिलेखापाल.

Pravin com/acer/ahawaal/aa२/letter/.